शिक्षण विभाग(प्राथमिक),जि.प.नाशिक
जि.प.भवन,त्र्यंबक नाका,नाशिक ४२२००१
दुरध्वनी क्रमांक(कार्यालय) ☎-०२५३-२५०८०७५ e mail-mdmnashik@gmail.com

शिक्षण विभाग(प्राथमिक) जि.प.नाशिक
जाक्र.शिक्षण/प्राथ-2/ 04 /2018
दिनांक:- 12 /01/2018

प्रति,
गटविकास अधिकारी/गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती, बागलाण, चांदवड,देवळा, कळवण,मालेगाव,नांदगाव,पेठ,सिन्नर,सुरगाणा

विषय:-कमी गुणवत्तेमुळे पटसंख्या खालावत असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांचे जवळच्या चांगल्या गुणवत्तेमुळे पटसंख्या वाढत असलेल्या शाळेमध्ये समायोजन करणे बाबत.

संदर्भ:- 1. मा.शिक्षण संचालक,प्राथमिक शिक्षण संचालनायलय, महाराष्ट्र राज्य पुणे-1 यांचे कडील पत्र क्र. प्राशिसं /2017/ड-513/5536 दिनांक 23 नोव्हेंबर 2017
2. मा.शिक्षण संचालक,प्राथमिक शिक्षण संचालनायलय, महाराष्ट्र राज्य पुणे-1 यांचे कडील पत्र क्र. प्राशिसं /2017/ड-513/6227 दिनांक 28 डिसेंबर 2017
3. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.02.01.2018 रोजी व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये दिलेले निर्देश

महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम,2011 मधील तरतूदीनुसार प्राथमिक शाळा 1 कि.मी. अंतरावर व उच्च प्राथमिक शाळा 3 कि.मी. अंतरावर उपलब्ध करावयाची आहे. राज्यातील 0 ते 10 पटसंख्या असलेल्या व विहित निकषांइतक्या अंतराच्या आत नजिकची शाळा उपलब्ध आहे अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच, खाजगी अनुदानित प्राथमिक/उच्च प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांचे समायोजन नजिकच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या/खाजगी अनुदानित शाळेत करणे शक्य आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भान्वये खालील जि.प.शाळांचे जवळच्या शाळेमध्ये समायोजन करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्या नुसार खालील अ.क्र.2 मध्ये नमूद केलेल्या शाळांचे अ.क्र.6 मध्ये नमूद केलेल्या शाळांमध्ये समायोजन करण्यात यावे.

| अ.क्र | समायोजन करावयाच्या शाळेचे नाव | शाळेचा युडायस कोड | विद्यार्थी पटसंख्या | तालुका | ज्या शाळेत समायोजन करावयाचे आहे त्या शाळेचे नाव | शाळेचा युडायस कोड | तालुका | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | लहान सूळपाडा | 27201312004 | 7 | सुरगाणा | जि.प.प्रा.शाळा सूळपाडा | 27201312004 | सुरगाणा | जि.प. |
| 2 | भुसीपाडा | 27201314002 | 3 | सुरगाणा | जि.प.प्रा.शाळा रासा | 27201314001 | सुरगाणा | जि.प. |
| 3 | इवरपाडा | 27201304702 | 5 | सुरगाणा | वनवासी कल्याण आश्रम कुकडणे | 27201309903 | सुरगाणा | खाजगी अनुदानीत |
| 4 | पवारपाडा | 27201310502 | 2 | सुरगाणा | वनवासी कल्याण आश्रम कुकडणे | 27201309904 | सुरगाणा | खाजगी अनुदानीत |
| 5 | महालपाडा | 27201305906 | 10 | सुरगाणा | वनवासी कल्याण आश्रम कुकडणे | 27201309903 | सुरगाणा | खाजगी अनुदानीत |
| 6 | केळीपाडा | 27201303401 | 2 | सुरगाणा | अनुदानीत आश्रम शाळा चिंचले | 27201303403 | सुरगाणा | खाजगी अनुदानीत |
| 7 | चिकरपाडा | 27201309902 | 3 | सुरगाणा | वनवासी कल्याण आश्रम कुकडणे | 27201309904 | सुरगाणा | खाजगी अनुदानीत |
| 8 | जि.प.प्रा.शाळा चोहोल शिवार(धांद्री) | 27200104903 | 10 | बागलाण | जि.प.शाळा धांद्री | 27200104901 | बागलाण | जि.प. |
| 9 | जि.प.शाळा नाविनपाडा (वटकपाडा) | 27201411204 | 8 | त्र्यंबकेश्वर | जि.प.शाळा वटकपाडा | 27201411201 | त्र्यंबकेश्वर | जि.प |
| 10 | जि.प.प्रा.शाळा वाठोडे (केरोबानगर) | 27200116801 | 9 | बागलाण | जि.प.शाळा सावरपाडा (वाठोडा) | 27200116802 | बागलाण | जि.प. |
| 11 | जि.प.प्रा.शाळा निमोणीचामळा | 272001212902 | 7 | सिन्नर | जि.प.शाळा वावी | 27201212901 | सिन्नर | जि.प. |
| 12 | गायदरपाडा | 27201306405 | 5 | सुरगाणा | जि.प.शाळा घागरबुडा | 27201306406 | सुरगाणा | जि.प. |

Scanned by CamScanner

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 13 | जि.प. शाळा दुबेवाडी | 27201402604 | 9 | त्र्यंबकेश्वर | जि.प. शाळा ढहाळेवाडी | 27201402601 | त्र्यंबकेश्वर | जि.प. |
| 14 | मोहाचापाडा | 27201104003 | 7 | पेठ | श्री.चक्रधर माध्य.विद्यालय कुंभाळे | 27201108602 | पेठ | खाजगी अनुदानीत |
| 15 | जि.प.प्रा.शाळा पवारवस्ती (ब) (भडाणे) | 27200102502 | 10 | बागलाण | जि.प. शाळा ताहाराबाद | 27200115101 | बागलाण | जि.प. |
| 16 | जि.प.प्रा.शाळा सरोवरवस्ती, गोंडेगाव | 27200803002 | 6 | नांदगाव | जि.प.प्रा.शाळा गोंडेगाव | 27200803002 | नांदगाव | जि.प. |
| 17 | जि.प.प्रा.शाळा उर्दू निंबायती | 27200709603 | 9 | मालेगाव | जि.प.माध्यमिक शाळा | 27200709604 | मालेगाव | जि.प. |
| 18 | जि.प.शाळा कळवण उर्दू | 27200606507 | 10 | कळवण | जि.प.शाळा रामनगर(कळवण | 27200606506 | कळवण | जि.प. |
| 19 | चींचपाडा गुही | 27201303501 | 5 | सुरगाणा | वनवासी कल्याण आश्रमशाळा गुही | 27201305904 | सुरगाणा | खाजगी अनुदानीत |
| 20 | रताळीपाडा | 27201317902 | 10 | सुरगाणा | जि.प.शाळा वाघनखी | 27201317901 | सुरगाणा | जि.प. |
| 21 | टाकळीपाडा | 27201311702 | 10 | सुरगाणा | जि.प.शाळा मोठामाळ | 27201311701 | सुरगाणा | जि.प. |
| 22 | बर्डा | 27201315503 | 10 | सुरगाणा | खा.अनु.शाळा बर्डा | 27201314502 | सुरगाणा | खाजगी |
| 23 | सागपाडा | 27201308803 | 8 | सुरगाणा | सागपाडा | 27201308803 | सुरगाणा | जि.प. |
| 24 | जि.प.प्रा.शाळा पायरपाडा | 27200114201 | 7 | बागलाण | जि.प.शाळा भिकरसोंडा साल्हेर | 27200114202 | बागलाण | जि.प. |
| | | | | | शासकीय आश्रमशाळा साल्हेर | 27200144205 | बागलाण | खाजगी |
| 25 | जि.प.शाळा भिकरसोंडा (साल्हेर) | 27200114202 | 4 | बागलाण | जि.प.शाळा पायरपाडा | 27200114201 | बागलाण | जि.प. |
| 26 | जि.प.प्रा.शाळा उर्दू दाभाडी | 27200702505 | 4 | मालेगाव | जि.प.कन्या शाळा दाभाडी | 27200702504 | मालेगाव | जि.प. |
| 27 | जि.प.प्रा.शाळा उर्दू देवळा | 27200300703 | 10 | देवळा | जि.प.मराठी शाळा देवळा | 27200300701 | देवळा | जि.प. |
| 28 | जि.प.प्रा.शाळा बेझचा पाडा | 27201409607 | 4 | त्र्यंबकेश्वर | जि.प.प्रा.शाळा बेझ | 27201401201 | त्र्यंबकेश्वर | जि.प. |
| 29 | जि.प.प्रा.शाळा पवारवस्ती (मेसनखेडे खु.) | 27200206003 | 10 | चांदवड | 1) जि.प.शाळा मेसनखेडे खु. 2) नॉलेज इंग्लिश मिडीयम शाळा मेसनखेडे खु. | 27200205901/ 27200206004 | चांदवड | जि.प. |
| 30 | उंबरपाडा | 27201308306 | 10 | सुरगाणा | जि.प.शाळा सुकापूर | 27201308304 | सुरगाणा | जि.प. |
| 31 | भोरमाळ | 27201302502 | 7 | सुरगाणा | शासकीय आश्रमशाळा भोरमाळ | 27201302504 | सुरगाणा | आदिवासी विभाग |

1. उपरोक्त यादीतील अ.क्र. 16 व 27 मधील अनुक्रमे जि.प.प्राथमिक शाळा सरोवर वस्ती (गोंडेगाव) ता.नांदगाव आणि जि.प.प्राथमिक शाळा देवळा उर्दु ता.देवळा या दोन्ही शाळा पटसंख्येअमावी दिनांक 23 नोव्हेंबर 2017 पूर्वीच बंद झालेल्या असल्याने व विद्यार्थी व शिक्षक समायोजनाची प्रक्रिया यापूर्वीच झालेली असल्याने आता त्यांचे समायोजनाचा प्रश्न उद्‌भवत नाही. अ.क्र.24 मधील जि.प.प्रा.शाळा पायरपाडा या शाळेत अ.क्र.25 मधील जि.प.प्रा.शाळा भिकारसोंडा ता.बागलाण या शाळेतील विद्यार्थ्यांचे समायोजन करण्याचे निर्देश असल्याने पायरपाडा शाळेतील विद्यार्थ्यांचे समायोजन करता येणार नाही.
2. यादीतील उर्वरीत 28 प्राथमिक/उच्च प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांचे वरीलप्रमाणे समायोजन करण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी.
3. सदर विद्यार्थ्यांचे समायोजन केल्यावर त्यांची माहिती संबंधित शाळेच्या सरलच्या माहितीमध्ये भरणे व अन्य अनुषंगिक कार्यवाही करण्यात यावी.
4. संबंधित शाळेतील शिक्षकांची पदस्थापना, विद्यार्थ्यांचे ज्या शाळेत समायोजन केले आहे, त्या शाळेत रिक्तपदे उपलब्ध असल्यास, त्याच शाळेत करण्यात यावी व त्या शाळेत त्यांचे वेतन व भत्ते काढण्यात यावे. विद्यार्थी समायोजित करावयाच्या शाळेत रिक्त पदे उपलब्ध नसल्यास महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.जिपब-511/प्र.क्र.54/आ-14 दि.18/05/2011 मधील तरतूदी नुसार दिनांक 30 सप्टेबर रोजी निश्चित केलेल्या पटसंख्येनुसार अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा कमी शिक्षक असलेल्या शाळांवर समूपदेशनाने जि.प.व्यवस्थापनाच्या शाळेत समायोजन

Scanned by CamScanner

करावे. तालुक्यामध्ये समायोजन करत असताना कोणत्याही द्विशिक्षकी किंवा तीन शिक्षकी शाळेत पद रिक्त राहणार नाही अशा रितीने समुपदेशनाने पदस्थापना देण्यात यावी. तालुकास्तरावर समायोजन करत असताना प्रथम केंद्रांतर्गत समायोजन करावे. केंद्रात रिक्त पद नसल्यास बिटांतर्गत समायोजन करावे संबंधीत बिटात रिक्त पद नसल्यास तालुकांतर्गत नजीकच्या बिटात समायोजन करावे. तालुक्यात रिक्त पद नसल्यास तालुकाबाह्य समायोजनासाठी जि.प.कार्यालयास प्रस्ताव सादर करावा.

5. तसेच इतर व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे समायोजन करावयाच्या शाळांचे बाबतीत देखील मूळ शाळेतील शिक्षकांचे उपरोक्त मुद्दा क्र.4 मध्ये नमूद केल्याप्रमाणे समायोजनाबाबतची कार्यवाही करावी.

6. वरील प्रमाणे कमी गुणवत्तेमुळे पटसंख्या खालावत असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांचे रकाना क्र.6 मध्ये दर्शविलेल्या जवळच्या चांगल्या गुणवत्तेमुळे पटसंख्या वाढत असलेल्या शाळेमध्ये समायोजन करताना मा.संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी सूचित केलेल्या शाळेवर समायोजन करणे विद्यार्थ्यांसाठी अडचणीचे होत असल्यास अशा शाळांचे बाबतीत संबंधीत गटाचे गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांनी शाळेला भेट देऊन येणाऱ्या अडचणींबाबत तपशील नमूद करुन नजीकच्या दुसऱ्या शाळेवर समायोजन करणेसाठी वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा.

7. ज्या विद्यार्थ्यांचे समायोजन करावयाची शाळा माध्यमिक शाळा, असे नमूद केलेले आहे अशा विद्यार्थ्यांचे बाबतीत इ.1 ते 4 थीचे विद्यार्थी यांचे समायोजन करणेसाठी नजीकची प्राथमिक शाळा सूचविण्यात यावी.

8. विद्यार्थ्यांचे समायोजन करण्यासाठी प्राथमिक शाळा 1 कि.मी. अंतरावर व उच्च प्राथमिक शाळा 3 कि.मी. अंतरावर उपलब्ध असणे आवश्यक आहे. तथापि तशी सुविधा नसलेल्या विद्यार्थ्यांचे बाबतीत त्यांना सर्वशिक्षण अभियान योजनेतून परिवहन सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा.

मा.शिक्षण संचालक,प्राथमिक शिक्षण संचालनायलय, महाराष्ट्र राज्य पुणे-1 यांचे कडील पत्र क्र.प्राशिसं/2017/ड-513/6227 दिनांक 28 डिसेंबर 2017 मधील समायोजनानंतर करावयाच्या कार्यवाहीबाबत दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे पुढील 28 शाळांतील विद्यार्थ्यांचे जवळच्या शाळेत समायोजनाची कार्यवाही करावी. तसेच सदर 28 शाळांमधील शिक्षकांच्या समोयाजनासंदर्भात वरील प्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

प्रत,

मा.आयुक्त,(शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव सादर.
उपसचिव, शालेय शिक्षणव क्रीडा विभाग,मंत्रालय, मुंबई-32

Scanned by CamScanner

शिक्षण विभाग(प्राथमिक),जि.प.नाशिक
जि.प.भवन,त्र्यंबक नाका,नाशिक ४२२००१
दुरध्वनी क्रमांक(कार्यालय) ☎-०२५३-२५०८०७५ e mail-mdmnashik@gmail.com

जाक्र.शिक्षण/प्राथ-2/05 /2018
दिनांक:-12 /01/2018

प्रति,

मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
जिल्हा परिषद नाशिक

**विषय:- जिल्हा परिषद नाशिक वेबसाईटवर आदेश प्रसिध्द करणे बाबत**
कमी गुणवत्तेमुळे पटसंख्या खालावत असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांचे जवळच्या चांगल्या गुणवत्तेमुळे पटसंख्या वाढत असलेल्या शाळेमध्ये समायोजन करणेबाबत

---

संदर्भ:- मा.मु.का.अ.यांचे कडील आदेश क्र.शिक्षण/प्राथ-2/04/2018 दि.12/1/2018

**महोदय ,**

वरील विषयान्वये शिक्षण विभाग प्राथमिक अधिनस्त कमी गुणवत्तेमुळे पटसंख्या खालावत असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांचे जवळच्या चांगल्या गुणवत्तेमुळे पटसंख्या वाढत असलेल्या शाळेमध्ये समायोजन करणेबाबतचे संदर्भिय आदेश मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,नाशिक यांनी निर्गमित केलेले आहेत.

सदर आदेश जिल्हा परिषद नाशिकच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,नाशिक यांनी आदेशीत केलेले आहे.

कृपया सदरचे आदेश जिल्हा परिषद नाशिकच्या वेबसाईटवर सहा महिन्याच्या कालावधीसाठी प्रसिध्द करणेत यावे, ही विनंती.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद नाशिक.**

Scanned by CamScanner